Punyanagri (Mumbai)
2 Feb 2015

# आयनॉक्स विंड आणि टाटा पॉवरमध्ये करार

**। मुंबई :** आयनॉक्स विंड लिमिटेड (आयडब्ल्यूएल) या गुजरात फ्लुरोकेमिकल्स लिमिटेडची उपकंपनी असलेल्या आणि भारतातील आघाडीच्या पवनऊर्जा सेवा पुरवठादार कंपन्यांपैकी एक असलेल्या कंपनीसोबत टाटा पॉवर रिन्यूएबल एनर्जी लिमिटेड (टीपीआरईएल) या टाटा पॉवर कंपनी लिमिटेडच्या संपूर्ण मालकीच्या उपकंपनीने गुजरात व राजस्थान येथे प्रत्येकी ५४ मेगावॅट व ११८ मेगावॅट क्षमतेच्या दोन विंड-फार्म प्रकल्पांबाबत करार केले आहेत. आयडब्ल्यूएल आणि टीपीआरईएल यांनी करार केले असून त्यानुसार, आयडब्ल्यूएलने गुजरात व राजस्थान येथे आपल्या २ मेगावॅट विंड टर्बाइन जनरेटर्सच्या (डब्ल्यूटीजी) ८६ युनिटचा पुरवठा, इरेक्शन व कमिशनिंग करणे अपेक्षित आहे.

भावनगर जिल्ह्यातील रोजमल गावाजवळ असलेला गुजरात प्रकल्प जून २०१५ मध्ये पूर्ण होणार आहे, तर जैसलमेर जिल्ह्यातील डांगरी गावाजवळ असलेला राजस्थान प्रकल्प मार्च २०१६ पर्यंत दोन टप्प्यांत पूर्ण होणार आहे. आयडब्ल्यूएल जमीन संपादन, प्रकल्प विकास, इरेक्शन व कार्यान्वित करणे यांची जबाबदारी घेणार आहे, तसेच पवनऊर्जा प्रकल्पाचे दीर्घकाळ कार्य आणि देखभाल ही सेवाही देणार आहे. देशातील अनेक राज्यांमध्ये विजेचा तीव्र तुटवडा असताना आयनॉक्स-टाटा पॉवर करार होत आहे आणि विसंबण्यास योग्य व स्वच्छ पर्यायी ऊर्जास्रोत पुरवून या क्षेत्रात पवनऊर्जा कशा प्रकारे महत्त्वाची भूमिका बजावेल हे यातून स्पष्ट होते.